
Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

Special Issue, January 2018

International Multilingual Research Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®



# मराठा कालखंडाचे विविधांगी आकलन



डॉ.नंदकुमार जाधव
(इतिहास विभाग प्रमुख)

डॉ.गोविंदराजे निंबाळकर
(प्राचार्य)

# || Index ||

1) छत्रपती शिवाजी महाराजांचे जमीन ,महसुल धोरण
प्रा.भाऊसाहेब खंडु सांगळे, मंचर ||9

2) ऐतिहासिक मराठी चित्रपटातून व्यक्त झालेला मराठ्यांचा इतिहास
प्रा.के.जे.चव्हाण, भोर ||12

3) सृष्टीकर्ते छत्रपती शिवाजी महाराज
प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे, भिलवडी ||16

4) बाजीराव—मस्तानी : एक यशस्वी चित्रपट
प्रा.डॉ.संजय दगडू घोडेकर, जि.पुणे. ||20

5) खर्ड्याची लढाई : एक अभ्यास
डॉ. भूषण गोविंद फडतरे, जि. पुणे ||24

6) शिवछत्रपतींचे सामाजिक आकलन
डॉ.भाऊसाहेब दा. गव्हाणे, जि.पुणे ||29

7) इमानी शेलारमालुसरे घराण्याला मिळालेली वंश परंपरागत पारगडची किल्लेदारी...
प्रा.डॉ शामराव घाडगे, बारामती ||32

8) शिवशाही व मराठेशाहीचा ऐतिहासिक नवा संदर्भ ग्रंथ-'पुरंदरचे धुरंधर'(२०१६) (लेखक...
प्रा. डॉ. मधुकर गणेश मोकाशी, जि. पुणे ||34

9) मराठ्यांच्या इतिहासात किल्ल्यांचे महत्व
प्रा.डॉ.भारती शंकरराव नवथर., अहमदनगर. ||37

10) मराठेकालीन माळव्याच्या राज्यव्यवस्थेतील साहुकारांचे योगदान : होळकर राज...
सचिन अभिमन्यू ओहोळ, पुणे ||39

11) छत्रपती शिवाजी महाराज : आर्थिक संरक्षण धोरणाचे प्रणेते
डॉ.पठारे उत्तम आप्पासाहेब, पुणे. ||42

12) मराठा कालखंडातील मंदिरस्थापत्य विशेषसंदर्भ : सोमेश्वर मंदिर, पाषाण, पुणे.
डॉ. स्वाती काळभोर, पुणे . ||46



https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com
https://sites.google.com/site/vidyawartajournal
PADMAMANI JAIN C... Pabal Tal.Shirur Dist.Pune

04

# बाजीराव—मस्तानी : एक यशस्वी चित्रपट

प्रा.डॉ.संजय दगडू घोडेकर
प्राचार्य,
श्री. पद्ममणि जैन महाविदयालय,पाबळ, ता.शिरूर, जि.पुणे.

**********

संजय लीला भन्साळी दिग्दर्शीत बाजीराव — मस्तानी चित्रपट प्रदर्शित झाला आणि या चित्रपटाने इतकी लोकप्रियता मिळविली की अनेक मानांकने या चित्रपटाला मिळाली. हिंदी चित्रपट सृष्टीत उत्तम कलाकृती म्हणून या चित्रपटाकडे पाहिले जाते. चित्रपटाच्या सुरूवातीलाच संजय लीला भन्साळी यांनी स्पष्ट केले आहे की, ही कथा काल्पनिक असून ना.सं.इनामदार यांच्या 'राऊ' या कादंबरीवर आधारीत आहे. त्यामध्ये कोणाच्याही भावना दुखवायचा हेतू नाही. बाजीराव — मस्तानी चित्रपटाच्या माध्यमातून मराठा पेशवा बाजीराव — मस्तानी यांची प्रेमकथा पडदयावर आणली आहे. खास भन्साळी टच असलेली ही कथा भव्य अशी आहे. अभिनेता रणवीर सिंहने बाजीराव, प्रियंका चोप्राने काशीबाई तर दिपीकाने मस्तानी साकारली आहे.

## बाजीराव— व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व

राधाबाईच्या पोटी इ.स. १७०० मध्ये बाजीरावाचा जन्म झाला. बाजीरावांचे पाळण्यातले नाव विश्वनाथ ठेवले होते. बाजीरावाच्या पूर्वजांचा विचार करता 'विश्वनाथ' हे नाव आजोबांच्या नावावरून ठेवले होते. बाजीरावची आई राधाबाई बाजीरावास 'बाजीराऊ' 'राऊ' म्हणत असे. बाजीरावाची मुले 'बाबासाहेब' म्हणत असत. तर इतर 'रावसाहेब' या नावाने ओळखत असत. बाजीराव अशा अनेक नावांनी कुटूंबात परिचित होता.

बाजीरावाचे व्यक्तिमत्त्व विशेष होते. भक्कम पीळदार शरीरयष्टी, शुभ्र गौरवर्ण, उमदे व्यक्तिमत्त्व, वागण्यातील उमदा स्वभाव, न्याय निष्ठूरवृत्ती, चेह—यावरील तेज अशा व्यक्तिमत्त्वामुळे उत्तर हिंदुस्थानात त्यांना पाहण्यासाठी रस्त्यावर स्त्री — पुरूषांची गर्दी जमे. यावरून बाजीरावाच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते. बाजीरावाच्या व्यक्तिविशेषाबद्दल 'दुसरा पेशवा' या नाटका संदर्भात डॉ.अ.ना.देशपांडे म्हणतात, बाजीरावाची मस्तानीबद्दलची रसिक उत्कट आसक्ती अपंग पत्नीबद्दलचे प्रेम व अनुकंपा, बंधुबद्दलचा प्रेमादरभाव, शाहू राजाविषयी निष्ठा, आत्मविश्वास, शौर्य, स्वत:च्या दुर्गुणांची जाणीव या त्याच्या सर्व व्यक्तिविशेषांचे मोठे उत्कटीत व प्रत्ययकारी दर्शन शिरवाडकरांनी घडविले आहे. दुसरा पेशवा हे नाटक पहिल्या बाजीरावाचे व्यक्तिमत्त्व साकार करण्याच्या हेतूने लिहिले आहे.

बाजीरावांना उत्तम विदयाभिरूची होती. बाजीराव विद्वानांचे चाहते होते. या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वामुळे बाजीराव महाराष्ट्रभर सर्व परिचित होते. बाजीरावांच्या व्यक्तिमत्वासारखेच कर्तृत्व देखील बिनतोड होते. कतर्श्तवात त्यांनी कधीही हलगर्जीपणा केला नाही. मराठयांच्या इतिहासात शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या खालोखाल, कदाचित कित्येक बाबतीत शिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या तोडीचे अद्भूत बाजीराव बल्लाळाच्या हातून घडलेली आहेत. बाजीरावाचे यश त्याला बुद्धीमुळे आलेले नसून धाडस, चपळाई, शौर्य व सततोदयोग यांमुळे प्राप्त झाले होते. त्याला गर्व नव्हता. त्याच्या जवळ ढक्केपंजे नव्हते. अशिक्षित व आडदांड मराठयांशीही तो बरोबरीने वागे. ब्राम्हणांच्या कर्मठपणाने त्याला बिलकुल पछाडलेले नव्हते. सांस्कशतिक ठशामुळे त्याचे पाय कोठेही ओढले जात नव्हते. सोबत्यांबरोबर दारू पिणे, कोंबडी खाणे किंवा मनाच्या सरळ भावनेने एखादी मुसलमानीन पकडणे यांत त्यास काहीही वाटत नव्हते.

बाजीरावाची किर्ती त्याच्या मृत्युनंतरही अमर आहे. शिवाजी महाराजानंतरच्या एक दोन पिढयांमागून महाराष्ट्रास ग्रासू पाहणारा राष्ट्रीय नादानपणा ज्यांनी निवारण केला आणि मराठेशाहीच्या नाशाचा दिवस एका शतकाने लांबविला, किंबहुना अव्वल मराठेशाहीत

स्वाभाविकपणे आढळून न येणारी मराठी साम्राज्याची कल्पना ज्यांनी दिल्ली, कलकत्ता येथपर्यंत फेलावून मूर्त स्वरूपात आणली, त्यांच्या कतर्शत्त्वाची आठवण पेशव्यांचा वंशच्छेद झाला, तरी बुजणे शक्य नाही, प्रत्यक्ष राजकीय सत्ता नश्वर असो, पण कर्तृत्त्वाची किर्ती अमर असते.

असं हे बाजीरावाचं व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व सर्वांगीण, सर्वगुण संपन्न होते, म्हणूनच बाजीरावाच्या ४० वर्षाच्या कारकीर्दीत त्यांनी ४१ लढाया जिंकल्या. बाजीरावाच्या हयातीत बाजीराव एकही लढाई हरला नाही. मस्तानीचा स्विकार करण्या अगोदरही नाही आणि मस्तानीचा स्विकार केल्यानंतरही एकही लढाई हरला नाही.

**मस्तानीचा इतिहास :—**

बाजीराव — मस्तानी हा विषय सर्वसामान्यांच्या आवडीचा आणि जिज्ञासेचा आहे. मस्तानीची संपूर्ण आणि तीही खरी माहिती नसल्यामुळे साहित्य, कथा, कादंब—या, नाटके, काव्य, चित्रपट या मधून हा विषय खूप रंगवून सांगितलेला असतो. मस्तानी ही बाजीरावाची रक्षा किंवा ठेवलेली स्त्री होती एवढीच सर्वसामान्यांना माहिती असते. त्यामुळे मस्तानीकडे पाहण्याचा दृष्टिकोनही तशाच स्वरूपाचा झालेला असतो. मस्तानीचं इतिहासातील स्थान काय होतं, हे अजून कुणालाही नीट समजलेलं दिसत नाही. इतिहासाचं महत्त्व पटवून देत असताना सदाशिव आठवले एके ठिकाणी म्हणतात, ''खरंखुरं ऐतिहासिक पात्र जेव्हा तुम्ही घेता, त्या वेळेला ते ऐतिहासिक पात्र मी असं पाहिलं. माझ्या दृष्टीने संभाजी असा, मला दिसलेला पेशवा माधवराव असा किंवा मला दिसलेला दुसरा बाजीराव असा, हे मला वाटतं टिकण्यासारखं नाही. ऐतिहासिक व्यक्ती म्हणजे तुम्ही निर्माण केलेली वस्तू नाही. ती आहे आणि तुम्हाला तशी दाखवायचीय.'' मस्तानी नेमकी कोण होती यासंदर्भात अनेक प्रचलित दंतकथा आहे. परंतू मस्तानी बुंदेलखंडातील छत्रसाल राजाची होती असेच पुरावे मिळतात.

बुंदेलखंडातील छत्रसाल राजाचा कुटुंब परिवार फार मोठा होता. त्याची जेष्ठ राणी पवार कन्या देवकुंवर हिच्याशिवाय छत्रसालास श्री.वियोगी हरीच्या म्हणण्यानुसार, 'छत्रसालके केवल १३ रानीयॉ थी । युद्धात पराजित केलेल्या शत्रूच्या मुलीशी लग्न लावण्याची छत्रसाल राजाची पद्धत होती. विशेष म्हणजे या राण्यांमध्ये क्षत्रियापेक्षा कमी दर्जाच्या जातीच्या स्त्रिया होत्या. त्याचप्रमाणे मुसलमान स्त्रियाही होत्या. अशाच एका मुसलमान स्त्रीपासून झालेली मस्तानी ही छत्रसालाची अनौरस कन्या होती. महराज छत्रसाल राजाच्या अनौरस संततीची माहिती मिळते. त्यात म्हटले आहे, ''एक मुसलमान उपपत्नीसे भी छत्रसाल के समशेर खॉ और खॉजहॉ नामक दो पुत्र और एक पुत्री थी । जनश्रुती है की यही पुत्री पेशवा बाजीराव प्रथम को भेट की जानेवाली प्रसिद्ध मस्तानी थी ।''

मस्तानी बाजीरावाच्या जीवनात इ.स. १७२९ नंतर म्हणजे मुहमद बंगष विरूध्दच्या मोहिमेनंतर केव्हातरी आली. या संदर्भात ग्रॅंट डफ म्हणतो, **He (Bajeerao) also left one itlegegitimate son by a Mohomedan mother whom he bred mussalman and named shumsher bahadhur.**

मस्तानी ही छत्रसाल राजाची कन्या होती. म्हणूनच समशेर बहाद्दूरच्या वंशजाना पेशव्यांनी बुंदेलखंडची जहागिरी दिली. तसेच अलिबहादूरचा दिवाण दिनकर बल्लाळ गोरे हा दक्षिण ब्राम्हणच होता. १८५७ सालच्या समरात बांदयाच्या नबाबाने (समशेर बहादूर पणतू) फौजेसह नानासाहेबांच्या कुमकेस धावून जावे ही घटना तर विशेष अर्थपूर्ण आहे. जर मस्तानीचा आणि पेशवे कुटुंबाचा काहीच संबंध नव्हता, असे गृहित धरले तर मस्तानीच्या वंशजांनी पेशव्यांशी ऐवढे एकनिष्ठ राहण्याचे काहीच कारण नव्हते. म्हणूनच उत्तर पेशवाईतला प्रभाकर शाहीर पेशवे वंशावरील आपल्या पोवाडयात म्हणतो,

' गढ मंडळ बुंदेलखंड, उघईत अखंड राहून थंड सही केले । प्रतापे करून या जगात नाव मिळविले, बुडवुनिया बहाद्दरास, आणली घरास माषुक मस्तानी ! अशी बाजीरावाची कीर्ती गातो. त्यामुळे मस्तानी ही बुंदेलखंडार्तूनच बाजीरावास भूदानाबरोबर मिळाली होती.

पेशवे कुटुंबात मस्तानीचा प्रवेश म्हणजे पेशवे कुटुंबाला लागलेला एक कलंकच. (राधाबाई, चिमाजी आप्पा आणि नानासाहेब यांच्या दृष्टीने) इ.स. १७२९

नंतर बाजीरावाच्या सानिध्यात मस्तानी उणीपुरी दहा वर्षे होती. हा दहा वर्षाचा काळ म्हणजे बाजीरावाच्या दृष्टीने पर्यायाने मस्तानीच्या दृष्टीने कर्दनकाळच होता.

मस्तानीचा बाजीरावाने स्विकार क्रेल्यानंतर काशीबाईकडे बाजीरावाने दुर्लक्ष केले, असाही बोभाटा मस्तानी विरूध्द करण्यात आला. परंतू बाजीरावाने मस्तानीचा स्वीकार केल्यानंतर बाजीरावापासून मस्तानीस एक मुलगा झाला. उलट काशीबाईने तीन अपत्यांना जन्म दिला. सारांश मस्तानीचा बाजीरावाने स्वीकार केल्यामुळे बाजीरावाच्या रणकारणावर, राजकारणावर अथवा कौटुंबिक परिस्थितीवर कसलाही दुष्परिणाम झाला नाही.

हा तसा सारा बाजीराव — मस्तानी संबंधा बाबतच्या ऐतिहासिक कुतूहलाचा भाग झाला. त्याला तो मध्ययुगीन काळ, सामाजिक संकेत (मस्तानीचा रखेलीचा दर्जा) धार्मिक संकेत (हिंदू — ब्राम्हण व मुस्लिम संबंध तसेच समशेरच्या मौजी बंधनाचा तंटा इ. ) कौटुंबिक ताण असे अनेक पदर आहेत. अशी रोमांचकारकता आणि अपरिचितता असलेले दुसरे उदाहरण मराठी इतिहासात कदाचितच आढळेल. बाजीरावाच्या जवळपास येऊ शकेल असे या संदर्भात फक्त संभाजीराजांचे नाव येऊ शकेल. पण बाजीरावांच्या व मस्तानीच्या संबंधाबद्दल एक कलात्मक कुतूहल मराठी साहित्यिकांत व वाचकांत मोठया प्रमाणात निर्माण झालेले दिसते. संभाजी राजांना केंद्र करून मराठीत 'राजसंन्यास' किंवा बेबंदशाहीसारखी नाटके 'छावा' सारखी कादंबरी लिहिली गेलेली आहे. पण त्याहून बाजीराव — मस्तानी संबंधाच्या कलात्मक कुतूहलाची व्याप्ती नक्कीच मोठी आहे.

साडेतीनशे वर्षानंतर संजय लीला भन्साळी दिग्दर्शीत बाज़ीराव — मस्तानी हा विषय चित्रपटाच्या माध्यमातून उजेडात आला. एखादया मूळ कलाकृतीचे माध्यमांतर करताना दिग्दर्शक आपल्या कौशल्यानुसार स्वातंत्र घेत असतो आणि घ्यावेही लागते. अन्यथा चित्रपट लोकप्रिय होत नाही. संजय लीला भन्साळी यांनी दिग्दर्शीत केलेली ही एक भव्य प्रेमकथा आहे. त्याला खास भन्साळी टच लाभल्याने ती अधिक उंचीवर पोहचते. दीपिका आणि प्रियंका यांच्यात चित्रीत करण्यात आलेले अनेक सीन्स उत्तम आहे. संजय लीला भन्साळी यांनी फक्त बाजीराव — मस्तानी वरच लक्ष केंद्रीत केले नाही तर अधून मधून येणारे मराठीतील संवाद असो किंवा मराठी टोन मधले हिंदी संवाद यावर मेहनत घेतलेली आहे. पिंगा या गाण्यापूर्वी दीपिका आणि प्रियांकामध्ये रंगलेला संवाद बरेच काही सांगून जातो.

अभिनयाविषयी सांगायचे झाले तर रणवीर सिंहचा अभिनय छान झाला आहे. त्याची संवादफेक आणि अभिनय बघता त्याने खूप मेहनत घेतली असल्याचे जाणवते. दीपिकाने मस्तानी उत्तम साकारली आहे. एकीकडे ती घोडेस्वारी करताना दिसतेय तर दुसरीकडे कथ्थक करताना, प्रियांका चोप्राने काशीबाईच्या भूमिकेला योग्य न्याय दिला आहे. अभिनेता वैभव तत्त्ववादी चिमाजी आप्पा तर महेश मांजरेकर यांनी सातारच्या छत्रपतींची भूमिका साकारली आहे. मिलींद सोमण आणि तन्वी आझमी यांनी आपल्या भूमिकेला पूर्ण न्याय दिला आहे.

बाजीराव — मस्तानी मधील सर्व गाणी लक्षात राहण्यासारखी आहे. संजय लीला भन्साळीच्या संगीतावर मराठी भाषेचा प्रभाव दिसतो. चित्रपटाच्या रिलीजपूर्वी पिंगा आणि मल्हारी या दोन गाण्याविषयी वाद झाला असला तरी ती गाणी लोकप्रिय झाली आहे. चित्रपटाविषयी एकंदरीत सांगायचे तर खास भन्साळी टच आणि बाजीराव — मस्तानी हा ऐतिहासिक संदर्भ असलेला हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला आहे.

एकंदरीत बाजीराव — मस्तानी चित्रपटाची बलस्थाने अधिक असली तरी उणिवाही काही जाणवतात. चित्रपपटाच्या सुरूवातीलाच मस्तानी बाजीरावाची विनवणी करण्यासाठी साता—याला जाते असे दाखविले आहे. व त्यानंतर ते बुंदेलखंडात जातात व बंकष विरूध्दची लढाई बाजीरावाच्या मदतीने छत्रसाल जिंकतो असे दाखविले आहे. परंतू या लढाईच्या अगोदर मस्तानी कोण हे बाजीरावाला अजिबात माहित नव्हते. बंकष विरूध्दची लढाई जिंकून दिल्यानंतर छत्रसाल राजाने आपल्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा व मस्तानी बाजीरावास दिली होती व त्यानंतर मस्तानी पुण्यात आली. तसेच पिंगा या गाण्यामध्ये मस्तानी व



Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

काशीबाईचा एकत्र गाण्याचा कार्यक्रम दाखविलेला आहे. काशीबाई पायाने अपंग होती व काशीबाई आणि मस्तानी एकत्र नाचत असत असा इतिहासात कुठेही उल्लेख नाही.

बाजीराव लढाई जिंकल्यानंतर 'मल्हार' गाण्यावर नाचताना दाखविलेला आहे. आनंदाच्या भरात एखादा पुरूष नाचणे यात काही गैर नाही. परंतू मुख्य नायकाने (बाजीरावाने) डोक्यावरील टोप बाजूला काढलेला आहे व तो नाचतो आहे हे संयुक्तिक वाटत नाही. तसेच नासिरजंगाच्या लढाईत शत्रू पक्षाचा पाडाव करताना बाजीराव घोडयावर स्वार होऊन सर्व सैन्य पार करतो व नासिरजंगाचा पाडाव करतो ही थोडी अतिशयोक्ती वाटते. बुंदेलखंडातून मस्तानी पुण्यात आल्यानंतर ती काही काळ शनिवारवाडयात वास्तव्यास होती, आजही स्वतंत्र मस्तानी हवेली आहे. चित्रपटात ती शनिवार वाडयात न राहता बुधवार पेठेत वास्तव्यास होती असे दाखविले आहे, हेही योग्य नाही. शनिवार वाडयात मस्तानीला विरोध होऊ लागला त्यानंतर ती कांही काळ पाटस व काही काळ पाबळ येथे वास्तव्यास होती. पाटसचा आणि पाबळच्या आठ बुरूंजी गढीचा कुठेही चित्रपटात उल्लेख नाही.

पाबळला मस्तानीच्या संदर्भात खूप मोठे ऐतिहासिक महत्व असताना चित्रपटात पाबळ आणि पाबळचा परिसर येणे अपेक्षित होते. मस्तानीची समाधी पाबळला आहे. मस्तानीची आठ बुरूंजी गढी पाबळला होती. चित्रपटाच्या माध्यमातून पाबळ हे दुर्लक्षित राहिले. 'मस्तानी ' ही उपेक्षित राहिली तसे पाबळ सुध्दा राहिले. एवढया गोष्टी वगळता चित्रपट अतिशय सुंदर आहे. दिग्दर्शकाला चित्रपटाची निर्मिती करताना रसिकांना काय आवडेल याचा विचार करून चित्रपटांची निर्मिती करावी लागते. काहीही असले तरी संजय लीला भन्साळी यांच्या माध्यमातून **'बाजीराव — मस्तानी '** या विषयाला साडेतीनशे वर्षांनी पुन्हा एकदा प्रसिध्दी मिळाली हे ही नसे थोडके!

संदर्भ ग्रंथ


१ दिक्षित म.श्री. :'प्रतापी बाजीराव' थोरले बाजीराव चरित्र मंडळ, गीताभवन, सदाशिव पेठ, पुणे ३०.

२ ओक प्र.ग. : 'पेशवे घराण्याचा इतिहास' केसरी प्रकाशन, ५६८ नारायण पेठ, पुणे ३०.

३ गोडसे द.ग. : 'मस्तानी' पॉप्युलर प्रकाशन प्रा.ली., मालवीय मार्ग, ताडदेव, मुंबई.

४ इनामदार ना.सं. : 'राऊ', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०.

५ दिक्षित म.श्री. :'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' अंक २५२, जानेवारी, मार्च १९९०

६ जहागिरदार विश्वास : 'ना.सं.इनामदार यांची ऐतिहासीक कादंबरी' महाराष्ट्र साहित्य पत्रिका अंक २०८, जानेवारी/मार्च १९७९.


❑❑❑

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal. Shirur, Dist. Pune.

PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403